ePaper

# गरिबांची दिवाळी गोड ; राज्यातील दीड कोटी कुटुंबांना अल्पदरात जिवनावश्यक वस्तू



| वर्ष - 6 | अंक - 172 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

नवरात्रौत्सव
आजचा रंग
गुलाबी



www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 4 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



पण शिवसेनेत दोन गट झाले आहेत. त्यामुळे या दोन गटांपैकी एकाच गटाकडून उमेदवार जाहीर होणार की दोन्ही गटाकडून उमेदवार उभे केले जातील, हे अद्याप स्पष्ट झालं नाही.अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपासह शिवसेनेच्या दोन्ही गटाकडून उमेदवार जाहीर केले, तर निवडणूक आयोगासमोर पेच निर्माण होईल. तसेच अंधेरी पोटनिवडणुकीच्या तारखेआधी हा पेच मिटवता आला नाही. तर निवडणूक आयोगाकडून शिवसेनेचं निवडणूक चिन्ह (धनुष्यबाण) गोठवणं जाऊ शकते.

**- उज्जल निकम,** ज्येष्ठ, विशेष सरकारी वकील आणि कायदेतज्ज्ञ

मोंदींनी नायजेरीयावरून चित्ते आणल्याने देशात लम्पी आजार पसरला. चित्यांच्या अंगावर जसे ठिपके असतात, त्याप्रमाणे देशात गायीच्या अंगावर ठिपके दिसत आहेत, असा आरोप नाना पटोलेंनी केला आहे. मागच्या दोन-चार महिन्यांमध्ये नाना पटोले ज्याप्रमाणे बोलत आहेत. त्यावरून असं दिसतं की, नाना पटोले यांनाच लम्पी आजार झाला आहे. त्यांनाच चांगल्या डॉक्टरांकडे पाठवण्याची गरज आहे. त्यांचा आजार तपासून घेण्याची गरज आहे.

**-चंद्रशेखर बावनकुळे,** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष .



# पिंपरी-चिंचवडकर "बी- अलर्ट"!

## डेंग्यू, कोविडचा प्रादुर्भाव वाढतोय : डॉक्टरांकडून काळजी घेण्याचा सल्ला

**| -पुणे |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पुण्यासह पिंपरी-चिंचवडमध्ये डेंग्यूच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असताना, अनेक रुग्णांना डेंग्यू आणि कोविड-19 संसर्गाच्या लक्षणांमधील फरक समजू शकत नाही. त्यामुळे नागरिकांनी सावध रहावे. काळजी घ्यावी, असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात येत आहे. मान्सूनचा वेग कमी झाल्याने डेंग्यूच्या रुग्णांमध्ये अजूनही वाढ होत आहे. जानेवारीपासून, पुणे महानगरपालिकेने (PMC) शहराच्या हद्दीत किमान 319 पुष्टी प्रकरणे आणि किमान 3,018 संशयित प्रकरणे नोंदवली आहेत. PMC हद्दीत, कोविड-19 ची 708,815 प्रकरणे आढळून आली आहेत आणि साथीच्या रोगाच्या सुरुवातीपासून 9,746 मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याच्या आरोग्य विभागानुसार रविवारपर्यंत पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या ९५४ होती.**



इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया, पुणे चॅप्टरचे अध्यक्ष डॉ संजय पाटील म्हणाले की, कोणत्याही आजाराची लक्षणे आढळल्यास रुग्णांनी डॉक्टरांकडे जावे. "डेंग्यू आणि कोविड-19 मध्ये काही अतिव्यापी लक्षणे आहेत पण कोविड-19 ची प्राथमिक लक्षणे श्वसनाची आहेत. उच्च दर्जाचा ताप आणि थकवा या दोन्हींमध्ये सामान्य आहे. कोविड 19 मध्ये थकवा आणि ताप येतो आणि जातो. कोविड-19 नाकारण्यासाठी डॉक्टर अनेकदा RTPCR सारखी तपासणी करतात.

मात्र, पावसाळ्यात डेंग्यूचा प्रादुर्भाव अधिक असतो, असे डॉ. पाटील यांनी सांगितले. पीएमसीचे सहाय्यक आरोग्य प्रमुख डॉ. संजीव वावरे यांनी सांगितले की, डेंग्यूची सर्वात सामान्य लक्षणे म्हणून जास्त ताप आणि पुरळ ही आहेत. पावसाळ्यामुळे डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने जास्त ताप आल्यास रुग्णांनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### डेंग्यूच्या रुग्णांनी विश्रांती घ्यावी...

जेव्हा डेंग्यू चाचणी पॉझिटिव्ह येते तेव्हा डॉक्टर रुग्णांना जास्त हायड्रेट करण्याचा सल्ला देतात. डेंग्यू पॉझिटिव्ह असल्यास डॉक्टर प्लेटलेट्सचे परीक्षण करतात. शिवाय, डेंग्यूची परिस्थिती विश्रांती घेऊन आणि जास्त प्रमाणात हायड्रेटिंग करून नियंत्रणात आणता येते. डेंग्यूचे बहुतांश रुग्ण केवळ ओपीडीमध्येच हाताळले जातात. मात्र, डेंग्यूच्या आठ दिवसांनंतर "डेंग्यू शॉक" अशी स्थिती आहे. या काळात रुग्णांनी अधिक काळजी घेतली पाहिजे, असेही आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

# सोसायटीधारकांच्या समस्या हे राष्ट्रवादीचे अपयश!

## एकनाथ पवार : राष्ट्रवादी पुरस्कृत सोसायटी संवाद उपक्रमावर टीका

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

पिंपरी-चिंचवड शहरात तब्बल २० वर्षे सत्ता उपभोगलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला आता सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी दस्तुरखुद्द विरोधी पक्षनेते अजित पवार यांना पाचारण करावे लागत आहे. ज्या पक्षाचे सर्वाधिक नगरसेवक बांधकाम व्यावसायिक आहेत आणि ज्यांनी शहर विस्तारत व विकसित होत असताना पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष केले, ते काय सोसायटीधारकांच्या समस्या सोडवणार? अशी टीका भाजपा प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी 'संवाद सोसायटी धारकांशी' असा उपक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत शहरातील सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी विरोधी पक्षनेते अजित पवार स्वत: शहरात येणार आहे. संतोषनगर- थेरगाव येथील संतोष मंगल कार्यालयात उद्या, दि. ५ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम आयोजित केला आहे. यासंदर्भात



एकनाथ पवार यांनी राष्ट्रवादीवर सडकून टीका केली.

एकनाथ पवार म्हणाले की, राष्ट्रवादीची सत्ता असताना २० वर्षांत शहर विस्तारीत होत होते. त्यावेळी बांधकाम व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात प्रकल्प उभारले. त्यावेळी झालेल्या नियमबाह्य कामांमुळे आज शहरातील सोसायटीधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दुसरीकडे, या उपक्रमासाठी राष्ट्रवादीने भोसरी, पिंपरी आणि चिंचवड असे तीन विधानसभा मतदार संघनिहाय समन्वयक नेमले आहेत. वास्तविक, हा उपक्रम हा आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सोसायटीधारक मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न आहे. तीन मतदार संघासाठी नेमलेले सर्व समन्वय आणि संपर्क प्रमुख हे स्वत: पेशाने बांधकाम व्यावसायिक (बिल्डर) आहेत. राष्ट्रवादीत स्थानिक पातळीवर पक्षांतर्गत बांधकाम व्यावसायिकांची 'लॉबी' कार्यरत असताना सर्वसामान्य सदनिकाधारकांना न्याय कसा मिळणार? हा प्रश्न आहे.

### स्थानिक पदाधिकाऱ्यांचे अपशय...

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांना स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी विरोधी पक्षनेते अजित पवार यांना पाचारण करावे लागते. दीड-दोन हजार पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी असा दावा करणारे शहरातील राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचे हे अपयश आहे. सोसायटीधारकांचा पुळका निवडणुकीच्या तोंडावर आला आहे. त्यामुळे मतदार राष्ट्रवादीच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा घणाघातही एकनाथ पवार यांनी केला आहे.**

# राहुल गांधींच्या 'भारत जोडो' यात्रेत राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी होणार ?

## शरद पवारांनी केली भूमिका स्पष्ट

**।पुणे (आंबेठाण)। महाईन्यूज।**

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी येथून भारत जोडो यात्रेला प्रारंभ झाला आहे. एकूण १२ राज्ये व दोन केंद्रशासित प्रदेशातून ही यात्रा जाणार आहे. तर महाराष्ट्रात ७ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्यातील देगलुर येथे यात्रेचे आगामन होणार आहे. भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्रात राहुल गांधी यांच्या मोठ्या सभा घेण्याचे प्रदेश काँग्रेसचे नियोजन आहे.



महाराष्ट्रातील भारत जोडो यात्रेच्या समन्वयाची जबाबदारी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे देण्यात आली आहे. तर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही संघटनात्मक पातळीवर राहुल गांधी यांचा दौरा यशस्वी करण्यासाठी तयारी सुरू केली आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेत राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी होणार का? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना आज पुण्यात प्रसार माध्यमांकडून विचारण्यात आला. यावर शरद पवारांनी भूमिका स्पष्ट केली.

शरद पवार म्हणाले "हा कार्यक्रम काँग्रेस पक्षाचा राहुल गांधींच्या नेतृत्वाखालचा आहे आणि राहुल गांधींच्या नेतृत्वाखालच्या कार्यक्रमात त्यांच्या पक्षाच्या सहकाऱ्यांचा समावेश हे होणं योग्य राहील. इतरांनी त्यात सहभागी व्हावं असं काही कारण मला दिसत नाही किंवा कुणी व्हावं अशी सूचना केल्याचंही मला दिसत नाही."

### राहुल गांधी यांचा महाराष्ट्रात 16 दिवसांचा मुक्काम

**भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने राहुल गांधी यांचा १६ दिवसांचा महाराष्ट्रात मुक्काम राहणार असून, त्यांच्या नेतृत्वाखाली ३८३ किलोमीटर पदयात्रा काढण्यात येणार आहे. दरोज २५ किलोमीटर गांधी स्वत: या पदयात्रेतून चालणार आहेत. प्रमुख नेते, पदाधिकारी यांच्यासह दररोज शंभर कार्यकर्ते त्यांच्यासोबत राहणार आहेत. २५ किलोमीटरचा प्रवास जिथे संपेल ते मुक्काम करणार आहेत. विशेष म्हणजे १६ दिवसांच्या दौऱ्यात राहुल गांधी कुठेही हॉटेलमध्ये मुक्काम करणार नाहीत, तर तंबु टाकून त्यात मुक्काम करणार आहेत. मुक्कात ते त्या परिसरातील शेतकरी, विविध समाज घटक, महिला बचत गट यांच्याशी संवाद साधणार आहेत.**

## शॉर्ट न्यूज

### पुणे शहरात ऑक्टोबर 'हीट' जाणवणार

**।पुणे। महाईन्यूज ।**

शहरात उन्हाचा चटका जाणवू लागला असून, निरभ्र आकाशामुळे ऑक्टोबर 'हीट' वाढण्याची शक्यता आहे. सोमवारी बहुतांश भागात कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस पर्यंत गेल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे पुणेकरांनी निदान आठवडाभर तरी घराबाहेर पडताना रेनकोट बरोबरच उन्हाच्या चटक्यापासून वाचण्यासाठी योग्य खबरदारी घ्यावी.

संपूर्ण वायव्य भारतातून मॉन्सून परतला असतानाच, पुण्यासह राज्यातही अपवाद वगळता पावसाने उघडीप दिल्याचे चित्र आहे. मंगळवारी (ता.४) आकाश अंशतः ढगाळ तर दुपारनंतर हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. आकाश निरभ्र असल्यास कमाल तापमान तिशीच्या आसपास जाण्याची शक्यता आहे.

राज्यातही अनेक भागांत उन्हाचा चटका वाढला असून, विदर्भात बहुतांश ठिकाणी कमाल तापमान ३४ अंशांपार गेले आहे. उर्वरित राज्यात कमाल तापमान तिशीपार आहे. पुढील काळात ऑक्टोबर हीटचा चटका जाणवण्याची शक्यता आहे. मंगळवारी (ता. ४) पूर्व विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविली आहे.

## दिव्यांगांच्या निवासी शाळांची आता वर्षातून तीन वेळा तपासणी; जिल्हा परिषदेचा निर्णय

**। पुणे । महाईन्यूज ।**

जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या निवासी शाळांची आता वर्षातून किमान तीन वेळा तपासणी करण्याचा निर्णय पुणे जिल्हा परिषदेने घेतला आहे. यानुसार दरवर्षी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पहिली, डिसेंबर व जानेवारी महिन्यात दुसरी आणि फेब्रुवारी व मार्च महिन्यात तिसरी तपासणी करण्याचे नियोजन जिल्हा परिषदेच्या सामाजिक न्याय विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. ही तपासणी सामाजिक न्याय विभागामार्फत न करता शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत केली जाणार आहे.

दिव्यांगांच्या विशेष शाळांमध्ये मूकबधिर, कर्णबधिर विद्यालये, मतिमंद निवासी शाळा, अंध मुला-मुलींची शाळा, बहुविकलांग मुलांच्या विशेष शाळा आदींचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यात विविध संवर्गातील दिव्यांगांच्या मिळून एकूण ७७ विशेष शाळा असल्याचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रवीण कोरगंटीवार यांनी सांगितले. आतापर्यंत या शाळांची सामाजिक न्याय विभागामार्फतच तपासणी केली जात असे. यापुढे मात्र शिक्षण खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील तपासणी पथकांमार्फत ही तपासणी केली जाणार आहे.

## मुंबई-बंगळुरू मार्गावर पुन्हा दोन तासांचा 'ब्लॉक'

### ही वाहतूक वाकडमार्गे वळविण्यात येणार; शिवाजीनगर, कात्रजमार्गे पुढे जाता येणार

**।पिंपरी। महाईन्यूज ।**

मुंबई-बंगळुरू मार्गावरील चांदणी चौक येथील पूल पाडल्यानंतर लेन वाढविण्यासाठी स्फोटकाने रस्त्यालगतचा खडक फोडला जात आहे. यासाठी मंगळवारी रात्री साडे अकरा ते बुधवारी रात्री दीड असा दोन तासांचा 'ब्लॉक' घेतला जाणार आहे. मुंबईहून बंगळुरूच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर हा ब्लॉक असून या मार्गावरील वाहतूक वाकडमधून वळविण्यात येणार आहे. रविवारी पूल पाडल्यानंतर आता लेन वाढविण्यासाठी लगतचे खडक फोडायचे काम सुरू आहे. यासाठी सोमवारी दुपारी पाऊण तासांसाठी वाहतूक थांबवली होती.



उर्वरित खडक फोडण्यासाठी पुन्हा ब्लॉक घेतला जाणार आहे. मुंबईहुन बंगळुरूकडे येणाऱ्या मार्गावर हा ब्लॉक असेल. खडक फोडण्यासाठी १६ ठिकाणी छिद्र घेऊन स्फोट करण्यात येणार आहे. हे स्फोट होताना बंगळुरुहुन मुंबईकडे जाणारी वाहतूकही दहा ते पंधरा मिनिटांसाठी थांबवण्यात येणार आहे. स्फोट झाल्यानंतर लगेचच या मार्गाची वाहतुक सुरू होईल. मात्र, मुंबईहुन बंगळुरुकडे जाणारी वाहतूक राडारोडा हटविल्यानंतर रात्री दीडनंतर सुरू होईल. यादरम्यान, ही वाहतूक वाकडमार्गे वळविण्यात येणार आहे.

> खडक फोडण्यासाठी १६ ठिकाणी छिद्र घेऊन स्फोट करण्यात येणार आहे. हे स्फोट होताना बंगळुरुहुन मुंबईकडे जाणारी वाहतूकही दहा ते पंधरा मिनिटांसाठी थांबवण्यात येणार आहे. स्फोट झाल्यानंतर लगेचच या मार्गाची वाहतुक सुरू होईल. मात्र, मुंबईहुन बंगळुरुकडे जाणारी वाहतूक राडारोडा हटविल्यानंतर रात्री दीडनंतर सुरू होईल.

## अग्निपथ'साठी बनावट रहिवासी प्रमाणपत्र देणारे दोघे अटकेत

**।पुणे। महाईन्यूज ।**

केंद्रीय संरक्षण विभागाच्या अग्निपथ योजनेत सैन्य भरतीसाठी बनावट रहिवासी प्रमाणपत्र (डोमिसाइल सर्टिफिकेट ) काढून देणाऱ्या दोन दलालांना गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली.पोपट विठ्ठल आलंदार (वय ३८) आणि सुरेश पितांबर खरात (वय ३१, दोघेही रा. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून बनावट रबरी शिक्के, शाळा सोडल्याचे कोरे दाखले, डोमिसाइल प्रमाणपत्र, रोकड तसेच अन्य कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. कात्रज -देहूरोड बाह्यवळण रस्त्यावर आलंदार आणि खरात थांबल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सापळा लावून दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे बनावट




रबरी शिक्के, शाळा सोडल्याचे कोरे दाखले आढळले.

लष्करातील नोकरीसाठी भरतीसाठी सध्या मुंबईत अग्निपथ भरती सुरू आहे. त्यात जी डी (जनरल ड्युटी) आणि टेक्निकल अशा दोन पदांसाठी भरती होत आहे त्यासाठी मुंबई, ठाणे, पालघर येथील रहिवासी अर्ज करू शकतात. याबाबतची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर काही उमेदवारांनी एका संस्थेत संपर्क साधला. आलंदार आणि खरात यांनी बनावट शाळा सोडल्याचा दाखला, रहिवासी पुरावा तयार करण्यासाठी बनावट

# पिंपरी-चिंचवडकरांची विकासात्मक दृष्टी महत्त्वाची!

## अजय चारठाणकर : जनसंवाद सभांना नागरिकांचा प्रतिसाद

पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जनसंवाद सभांसारख्या माध्यमातून नागरिकांनी घेतलेला सक्रीय सहभाग पिंपरी चिंचवड शहरासाठी विकासात्मक दृष्टीने महत्वपूर्ण ठरत आहे. नागरी सहभागामुळेच स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये “सिटीझन फिडबॅक” नोंदणीत देशात अव्वल स्थान पिंपरी चिंचवड शहराला मिळाले, असे मत आरोग्य विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर यांनी मांडले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी प्रत्येक सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली, यावेळी ह क्षेत्रीय कार्यालयात नागरिकांशी उप आयुक्त चारठाणकर यांनी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

उप आयुक्त चारठाणकर म्हणाले, आज पर्यंत पार पडलेल्या जनसंवाद सभांमध्ये सुमारे अडीच हजारांपेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग घेतला. जनसंवाद सभांमधून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यास मदत झाली. त्यामुळे तक्रारवजा सूचनांवर कार्यवाही करून प्रशासकीय गतीमानतेस चालना मिळाली. कार्यवाही करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेतला जात असल्याने नागरिकांचे प्रश्न जलद गतीने मार्गी लागण्यास मदत झाली. महापालिकेच्या ध्येय धोरणांमध्ये तसेच विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर प्रशासन भर देत आहे. विविध पातळीवर निरंतर विकास साध्य करण्यासाठी सामुहिक प्रयत्न आणि सहभागाची सतत गरज असल्याचे चारठाणकर यांनी सांगितले.

दरम्यान, आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत सुमारे ७४ नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे १४, ८, ६, ८, ७, ८, १८ आणि ५ नागरिकांनी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले. क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, पर्यावरण विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, समाज विकास विभागाचे उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, आरोग्य विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, भूमी जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत जोशी, यांनी भूषवले. तसेच क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, सोनम देशमुख, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, राजेश आगळे, सीताराम बहुरे, शितल वाकडे, विजयकुमार थोरात हे उपस्थित होते. या सभांमध्ये स्थापत्य, जलनि:स्सारण, पाणीपुरवठा, विद्युत, नगररचना विभागांचे कार्यकारी अभियंता, उद्यान, वैद्यकीय, आरोग्य, करसंकलन आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### नागरिकांनी मांडल्या सूचना...

आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करण्यात यावा, अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात यावी, रस्त्यावरील अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने असे अतिक्रमणे काढण्यात यावे, उद्यानांमध्ये लहान मुलांसाठी खेळणी बसविण्यात यावी तसेच ओपन जिम उभारण्यात यावी, ड्रेनेज वाहिन्या दुरुस्त करण्यात याव्यात, रस्त्यावरील धोकादायक ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात यावी, रस्त्यांची दुरुस्ती करावी, नो पार्किंग झोनमध्ये गाड्या लावणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, रस्त्यावर टाकण्यात आलेल्या राडारोड्यामुळे रहदारीस अडथळा होत असून संबंधितांना दंड आकारल्यास अशाप्रकारे राडारोडा टाकण्याचे प्रमाण कमी होईल, कचरा संकलन केंद्राजवळ दुर्गंधी होणार नाही याची दक्षता घ्यावी. सोसायट्यांमध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेडवर निष्कासनाची कारवाई करण्यात यावी. धोकादायक असलेले पथदिवे काढून नव्याने पथदिवे उभारावेत तसेच पथदिव्यांचे काम लवकर पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना वजा तक्रारी आज झालेल्या जनसंवाद सभेमध्ये नागरिकांनी मांडल्या.

# संस्काररुपी हिराबाई लांडगे यांचे अस्तित्व निरंतर !

## प्रवचन : ह. भ. प. धर्माचार्य ॲड. शंकर महाराज शेवाळे यांचे प्रतिपादन

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निर्मिकाच्या इच्छेशिवाय जगात आपण काहीही नष्ट करु शकत नाही किंवा निर्माणही करु शकत नाही. केवळ परिवर्तीत करु शकतो. जीवन हे एक चक्र आहे. यामध्ये शरीर आणि माणूस ओळखले पाहिजे. माणसं माणसांना ओळखत नाहीत. आज हिराबाई लांडगे शरीररुपी आपल्यातून निघून गेल्या असल्या तरी, संस्कारांच्या रुपाने आमदार महेश लांडगे, कामगार नेते सचिन लांडगे आणि उद्योजक कार्तिक लांडगे यांच्यासोबत निरंतर अस्तित्वात राहतील, असे प्रतिपादन ह.भ.प. धर्माचार्य ॲड. शंकर महाराज शेवाळे यांनी केले.**




आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री कै. सौ. हिराबाई लांडगे यांचे दि. २४ सप्टेंबर रोजी निधन झाले. भोसरी गावातील तळ्याकाठी सोमवारी सकाळी दशक्रिया विधी करण्यात आला. यावेळी शेवाळे यांचे प्रवचन झाले.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रकाश मिटभाकरे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार सुनील शेळके, भीमराव तापकीर, माजी आमदार बप्पूसाहेब पाठारे, यांच्यासह मान्यवरांनी शोकसंदेश व्यक्त करीत आदरांजली वाहिली. यावेळी पुणे जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी यांच्यासह विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. मातोश्री हिराबाई लांडगे यांच्या स्मरणार्थ लांडगे कुटुंबियांच्या वतीने विविध सामाजिक, अध्यात्मिक संस्थांना मदत निधी देण्यात आला.

ह.भ.प. धर्माचार्य ॲड. शंकर महाराज शेवाळे म्हणाले की, आईच्या संस्कारामुळेच मुले घडत असतात. आईचे संस्कार मुलांमध्ये परावर्तित होतात. सामान्य मुलगा असामान्य कर्तुत्व करुन महाराष्ट्रात लौकीक कमावते. हे संस्काराशिवाय अशक्य आहे. घरची परिस्थिती जेमतेम असताना मुलगा पैलवान घडवावा, अशी महत्त्वाकांक्षा ठेवणाऱ्या हिराबाई लांडगे यांच्यासारखी कर्तुत्वसपन्न आई सर्वांना लाभत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, विनोबा भावे अशी माणसं आईच्या संस्कारामुळेच घडली. सूत्रसंचालन नाना शिवले यांनी केले. लांडगे कुटुंबियांच्या वतीने माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांनी ऋण व्यक्त केले. पसायदान पठण करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## संपादकीय

# तंत्र आले; मंत्रीही यावा!

***माहिती आणि दूरसंवेदन तंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम प्रज्ञा आणि उपयोजित क्वांटम कम्प्युटिंग आदी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शाखा विशेषत: गेल्या दशकभरात वेगाने घोडदौड करीत आहेत. मुख्य म्हणजे, विज्ञान-तंत्रज्ञानातील नवे पाऊल जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ झपाट्याने कमी होत आहे.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतात ‘फाइव्ह-जी’ या दूरसंवेदन क्षेत्रातील क्रांतिकारी सुविधेचा आरंभ शनिवारी राजधानीत प्रगती मैदानावर झाला. मोदी यांच्या कार्यपद्धतीनुसार अर्थातच याचा मोठा सोहळा झाला आणि तो देशभर त्याचे प्रक्षेपण पाहिले गेले. मात्र, २०१९ मध्ये सुरू झालेली ही तंत्रसेवा आज जगात ७० देशांमध्ये पोहोचली आहे. चीन सरकारने तर पूर्ण देश ‘फाइव्ह-जी’च्या अमलाखाली आणला आहे. आज हे तंत्रज्ञान वापरणाऱ्यांमध्ये भूतान, केनिया, कझाकस्तान, मलेशिया, माल्टा आदी देश आहेत. अर्थातच, ‘एकसो तीस करोड’ नागरिकांच्या देशात ही सेवा सुरू होण्याला मोठे महत्त्व आहे आणि भारताचे अर्थकारण, शिक्षणव्यवस्था, आरोग्यसेवा किंवा छोट्यामोठ्या सरकारी सेवा या सर्वांमध्ये आमूलाग्र बदल घडविण्याची ताकद या तंत्रज्ञानात आहे. आज आपण जी इंटरनेट सेवा मोबाइल फोनद्वारा मिळवतो, तिचा वेग या तंत्रज्ञानामुळे १० ते ११ पटींनी वाढणार आहे. म्हणजे, एखादा चित्रपटही एक-दोन मिनिटांत डाउनलोड होऊ शकेल. भारतात इंटरनेट सेवा अत्यंत स्वस्त आहे. भारतापेक्षाही स्वस्त सेवा देणारे चार-दोनच देश असतील. मोदींनी या स्वस्ताईचा खास उल्लेख केला. या स्वस्ताईमुळे अगदी सामान्यातला सामान्य माणूसही मोबाइलच्या साह्याने आर्थिक किंवा इतर व्यवहार सहज, तसेच वेगाने करू लागेल. या लाभाचे एकूण आर्थिक गणितही मांडण्यात आले आहे. या उद्घाटन समारंभात उद्योगपती मुकेश अंबानी यांनी सांगितल्याप्रमाणे सन २०२३ अखेर सारा भारत ‘फाइव्ह-जी’ सेवेच्या कक्षेत येईल. हा मुहूर्त तसा फार दूर नाही. सन २०२३ ते २०४० या काळात सर्व भारतीयांनी विविध कामांसाठी हे तंत्रज्ञान वापरले तर अर्थकारणाला तब्बल ३६ लाख कोटी रुपयांचा लाभ होऊ शकेल, असे म्हटले जाते. हा आकडा प्रचंड आहे. आज आपण जगात अर्थव्यवस्थेच्या आकारात पाचव्या क्रमांकावर आहोत. ही प्रगती यामुळे आणखी पुढे जाऊ शकते. माहिती आणि दूरसंवेदन तंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम प्रज्ञा आणि उपयोजित क्वांटम कम्प्युटिंग आदी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शाखा विशेषत: गेल्या दशकभरात वेगाने घोडदौड करीत आहेत. मुख्य म्हणजे, विज्ञान-तंत्रज्ञानातील नवे पाऊल जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ झपाट्याने कमी होत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे हे सार्वत्रिकीकरण म्हटले तर मानव जातीला मोठे वरदान आहे. मात्र, त्याचे नेमके व समाजहितकारी उपयोजन हेही एक आव्हान आहे. भारतीय समाज नेमका त्यात कमी पडतो की काय, असा प्रश्न आहे. ‘फाइव्ह-जी’च्या समारंभात शाळकरी मुले पंतप्रधानांशी बोलली आणि त्यांच्या संवादात नव्या तंत्रज्ञानाचा अभ्यासातील फायदा हा विषय होता.



## आनंदी सकाळ

# उद्धाराचा मार्ग दाखवणारी श्रीरामकथा

प्रभू श्रीराम नित्य ‘लोकाभिरामं’ आहे. श्रीरामकथा प्रत्येकाला अभय, सत्प्रेरणा, सात्विकता देणारी आहे. ही विवेक जागृत करणारी कथा आहे. श्रीराम कथा आबालज्येष्ठांना जीवनाच्या विधायक दिशेकडे नेणारी रम्य कथा आहे. या कथेच्या मुळाशी सत्चरित्रप्रधान, शीलप्रधान जीवनदृष्टी सामावलेली आहे. प्रभू श्रीरामांची सत्यावर गहन निष्ठा होती. हे सत्य कधीही जीर्ण, भग्न, व्यथित होणार नाही. वज्रासारखा दुर्धर संकल्प, स्नेहपूर्ण हळुवारता, वचनबद्धता यांचे परस्परांना समृद्ध करणारे संतुलन श्रीरामांच्या चरित्राचे वैशिष्ट्य आहे. श्रीराम चरित्रात नैतिक, भौतिक, आध्यात्मिक, शाश्वत, सक्रिय कर्मधर्म, सत्यनिष्ठेशी एकरूप झाले आहेत. हे चरित्र सर्व मूल्यांचा विस्तार करणारे आदर्श व सर्व गोष्टींकडे उदात्त गांभीर्याने बघण्याची दृष्टी देते. कलियुगाचे सर्व कलह, उपद्रव, व्यथांचे हरण करणारी, लोकमंगल करणारी, ज्ञान-विज्ञानाचे सर्व सार असलेली, पावन करणारी, उद्धाराचा मार्ग दाखवणारी श्रीरामकथा नित्य लोकप्रिय राहील.




# युक्रेनसाठी इतके तरी करावेच..



लष्करी मार्गाने युक्रेन नेस्तनाबूत होत नाही असे लक्षात येताच रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी त्या देशाच्या आग्नेय व दक्षिणेकडील चार प्रांतांमध्ये बनावट सार्वमत घडवून आणले आणि ते रशियामध्ये ‘विलीन’ करून घेतले. डॉनेत्स्क, लुहान्स्क, झापोरिझिया आणि खेरसन हे ते चार प्रांत. यांतील डॉनेत्स्क आणि लुहान्स्क हे रशियनबहुल आहेत. तर इतर दोन प्रांतांवर रशियाने कब्जा केलेला आहे. क्रिमिया या युक्रेनच्या आणखी एका प्रांतावर रशियाने २०१४ मध्येच अवैध कब्जा केला, तोही बनावट सार्वमताचा आधार घेऊनच. हा प्रांत खेरसनला खेटून आहे. त्यामुळे क्रिमिया ते लुहान्स्क अशा पाच प्रांतांचा लचका रशियाने युक्रेनपासून तोडल्यासारखा आहे. हे विलीनीकरण आणि अण्वस्त्रवापराची गर्भित धमकी अशा दुहेरी हत्यारांनी युक्रेनवरील कथित कारवाईचा निकाल लावण्याचे पुतिन यांचे मनसुबे दिसतात. परंतु युक्रेनचे अध्यक्ष वोलोदोमिर झेलेन्स्की यांचा निर्धार आणि युक्रेनी जनतेची जिद्द या दोन घटकांमुळे हे युद्ध इतक्यात, तसेच रशियाच्या अटी-शर्ती-मर्जीनुरूप नक्कीच संपणार नाही.

रणांगणावर युक्रेनने रशियाचे जोखड झुगारण्यासाठी शर्थ चालवली आहे. परंतु ही लढाई निव्वळ प्रतिहल्ल्यांनी जिंकणे अशक्य आहे. त्यासाठी शस्त्रसामग्री आणि राजनैतिक समर्थनही युक्रेनला सध्या मिळते, त्यापेक्षा अधिक पुरवावे लागेल. यासाठीच उत्तर अटलांटिक करार संघटना अर्थात नाटोच्या त्वरित सदस्यत्वासाठी युक्रेनने अर्ज केला आहे. सदस्यत्वाची ही प्रक्रिया अनेक स्तरांची आणि टप्प्यांची असते. यात प्रशासकीय, राजकीय आणि राजनैतिक बाबींची पूर्तता नाटोच्या सर्व ३० सदस्य देशांमध्ये व्हावी लागते. तितका वेळ शिल्लक राहिलेला नाही अशी झेलेन्स्की आणि त्यांच्या सल्लागारांची भावना आहे. क्रिमियापाठोपाठ आणखी चार प्रांतांवर रशियाने ताबा जाहीर केल्यामुळे युक्रेनचा जवळपास २० टक्के भूभाग रशियाच्या नियंत्रणाखाली आला आहे. तेथे स्थिरावून तो भाग युक्रेनकडून कायमस्वरूपी विलग करण्यापूर्वी हालचाली करणे आवश्यक आहे. युक्रेन आणि नाटो यांच्यात बोलणी सुरू होती, तेव्हा ‘नाटो आमच्या वेशीपाशी येऊन धडकणार’, या प्रमुख बतावणीचा आधार घेत रशियाने २४ फेब्रुवारी रोजी युक्रेनवर हल्ला केला होता. खरे तर त्या वेळी युक्रेन नाटोमध्ये सहभागी होईलच, हेही निश्चित नव्हते. विशेष म्हणजे त्यानंतरही बराच काळ झेलेन्स्की यांनी नाटो सदस्यत्वाविषयी ‘थांबू आणि वाट पाहू’, असेच धोरण अवलंबले. आता रशियाच्या विलीनीकरण नाट्यानंतर मात्र तातडीने काही तरी करण्याची गरज निर्माण झाली आहे. नाटोच्या सदस्यत्वासाठी त्वरेने अर्ज करण्याची निकड त्यातूनच उद्भवली. शनिवारी सायंकाळीच लायमान या मोक्याच्या शहरातून युक्रेनियन फौजांनी रशियन फौजांना हुसकावून लावले. रणांगणावर रशियाविरुद्ध असे निर्धारवर्धक विजय युक्रेन अधूनमधून मिळवू लागला आहे. मुत्सद्दी परिप्रेक्ष्यात मात्र या देशाला अजूनही सहकारी देशांच्या मदतीची नितांत गरज आहे.

# आप’चा वातावरणनिर्मितीचा खेळ?

**भाजपने देशाला दाखवून दिले आहे : लोकांमध्ये वातावरणनिर्मिती केली की, सत्य नेमके काय हे जाणून घेण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही.**

एखाद्या गोष्टीबद्दल इतक्या आत्मविश्वासाने बोलायचे की, समज सत्यामध्ये परावर्तित होतो. नोटाबंदीमुळे दहशतवादाचा नायनाट होईल असे भाजपने सांगितले होते आणि लोकांनी भाजपचा दावा खरा मानला होता. भाजपचा हा खेळ आता आम आदमी पक्षही (आप) शिकायला लागला आहे. ‘आप’ने लोकांचा समज करून द्यायला सुरुवात केली आहे की, भाजपच्या विरोधात फक्त ‘आप’च लढू शकतो. अन्य प्रादेशिक पक्षांत वा काँग्रेसमध्ये ही ताकद नाही. खरा विरोधी पक्ष आम्हीच आहोत असे ‘आप’ला सांगायचे आहे. वर्षअखेरीस गुजरात आणि हिमाचल प्रदेशमध्ये विधानसभेची निवडणूक होणार असून तिथे ‘आप’ सत्ताधारी भाजपविरोधात लढत असला तरी, त्याचे लक्ष्य काँग्रेसच्या जागी स्वत: विरोधी पक्ष बनण्याचे असावे. अन्यथा ‘आप’चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेस पक्ष आता संपल्यात जमा असल्याचे सातत्याने सांगितले नसते. सध्या केजरीवाल गुजरातमध्ये



धूमधडाक्यात प्रचार करत आहेत. तिथे त्यांचा शाब्दिक प्रहार भाजपपेक्षा काँग्रेसवर अधिक दिसतो. तिथे प्रत्येक जाहीर भाषणामध्ये केजरीवाल यांनी काँग्रेसविरोधात आक्रमक भूमिका घेतलेली दिसते. इकडे नितीशकुमार, लालूप्रसाद यादव दिल्लीत येऊन काँग्रेसशिवाय विरोधकांची महाआघाडी होऊ शकत नाही, असे सांगत असताना केजरीवाल मात्र काँग्रेसला फारसे महत्त्व द्यायला तयार नाहीत. हा केजरीवाल यांचा, लोकांच्या मनात काँग्रेसविषयी समज निर्माण करण्याचा खेळ असू शकतो! भाजपपेक्षा काँग्रेसविरोधात बोलणे ही ‘आप’ची राजकीय अपरिहार्यता झाली असावी असे दिसते.

दिल्लीच्या विधानसभेत काँग्रेस नाही, तर भाजपचे तीन आमदार आहेत. पण दिल्लीत आपल्याला विरोधक नाहीत असे ‘आप’ला वाटते. दिल्ली महापालिका ताब्यात घेतली की, भाजपला धडा शिकवल्याचे समाधान ‘आप’ला मिळू शकते. पंजाबमध्ये काँग्रेसची सत्ता ‘आप’ने हिसकावून घेतली, तिथे काँग्रेस विरोधी पक्षात असल्यामुळे तिथल्या नेत्यांनी ‘आप’ सरकारवर टीका करायला सुरुवात केली आहे. पण केजरीवाल यांचे म्हणणे आहे की, पंजाब असो नाहीतर अन्य राज्ये-काँग्रेसचे अस्तित्व संपत आले असेल तर काँग्रेस काय आरोप करतो वा मुद्दे उपस्थित करतो त्याकडे लक्ष कशाला द्यायचे? असे विधान करून केजरीवाल यांनी, पंजाबातील ‘आप’ सरकारपुढे असलेल्या प्रश्नांवर प्रत्युत्तर देणे टाळले आणि काँग्रेस संपणार असेल तर प्रमुख भाजपविरोधक म्हणून ‘आप’ काय म्हणते याकडे लक्ष द्या, असे सुचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### इम्तियाज जलील भाजपात जाणार?

। मुंबई । महाईन्यूज ।

भाजपा नेते आणि रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केलेल्या एका विधानामुळे एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. औरंगाबादमध्ये आयोजित कार्यक्रमात संबोधित करताना रावसाहेब दानवे यांनी मंचावरुनच ते एमआयएमचे आहेत, पण भाजपाचे वाटतात असं विधान केलं. दरम्यान, त्यांच्या या विधानावर इम्तियाज जलील यांनीही तात्काळ उत्तर देत चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

“मी इम्तियाज जलील यांच्या मताशी सहमत आहे. मराठवड्यात रेल्वेचं नेटवर्क नाही याचं मुख्य कारण म्हणजे आम्ही ब्रिटीश नाही, तर निजामच्या अधिपत्याखाली होतो. निजाम होता म्हणूनच आपण मागासलेलो आहोत. कारण त्याला रेल्वेची गरज नव्हती. पण आता मोदींच सरकार असून, मराठवाड्यातील नेटवर्कमध्ये वाढ होईल असं मी आश्वासन देतो,” असं रावसाहेब दानवे म्हणाले.

# “...तर शिवसेनेचं निवडणूक चिन्ह गोठवलं जाईल”!

## कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांचं मोठं विधान

। मुंबई । महाईन्यूज ।

**अंधेरी ( पूर्व ) विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. येथील शिवसेना आमदार रमेश लटके यांचं १२ मे रोजी निधन झाल्याने या जागेसाठी ही निवडणूक जाहीर करण्यात आली. या निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना पक्षात लढत पाहायला मिळण्याची शक्यता आहे. पण शिवसेनेच्या कोणत्या गटाकडून उमेदवार उभा केला जाईल आणि ‘धनुष्यबाण’ हे निवडणूक चिन्ह कोणाला मिळेल? हा प्रश्न पुन्हा एकदा उद्भवला आहे.**




**सरकारी वकील आणि कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांनी शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाबाबत मोठं भाष्य केलं आहे. अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपासह शिवसेनेच्या दोन्ही गटाकडून उमेदवार जाहीर केले, तर निवडणूक आयोगासमोर पेच निर्माण होईल. तसेच अंधेरी पोटनिवडणुकीच्या तारखेआधी हा पेच मिटवता आला नाही. तर निवडणूक आयोगाकडून शिवसेनेचं निवडणूक चिन्ह (धनुष्यबाण) गोठवणं जाऊ शकतं, अशी प्रतिक्रिया उज्ज्वल निकम यांनी दिली आहे. ते ‘ अंधेरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक आणि शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाबाबत भाष्य करताना उज्ज्वल निकम म्हणाले, “सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात ही बाब स्पष्ट केली आहे की, निवडणूक चिन्ह किंवा राजकीय पक्षाची मान्यता हा विषय केंद्रीय निवडणूक आयोगानं सोडवायचा आहे. त्यामुळे अंधेरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत कोणते पक्ष उभे राहणार आहेत? ते बघावं लागेल.**

याच पार्श्वभूमीवर विशेष सरकारी वकील आणि कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांनी शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाबाबत मोठं भाष्य केलं आहे. अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपासह शिवसेनेच्या दोन्ही गटाकडून उमेदवार जाहीर केले, तर निवडणूक आयोगासमोर पेच निर्माण होईल. तसेच अंधेरी पोटनिवडणुकीच्या तारखेआधी हा पेच मिटवता आला नाही. तर निवडणूक आयोगाकडून शिवसेनेचं निवडणूक चिन्ह (धनुष्यबाण) गोठवणं जाऊ शकतं, अशी प्रतिक्रिया उज्ज्वल निकम यांनी दिली आहे. ते ‘ अंधेरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक आणि शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाबाबत भाष्य करताना उज्ज्वल निकम म्हणाले, “सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात ही बाब स्पष्ट केली आहे की, निवडणूक चिन्ह किंवा राजकीय पक्षाची मान्यता हा विषय केंद्रीय निवडणूक आयोगानं सोडवायचा आहे. त्यामुळे अंधेरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत कोणते पक्ष उभे राहणार आहेत? ते बघावं लागेल.

तुमच्या म्हणण्यानुसार, जर येथे भाजपा आणि शिवसेनेचे उमेदवार उभे राहण्याची शक्यता आहे. पण शिवसेनेत दोन गट झाले आहेत. त्यामुळे या दोन गटांपैकी एकाच गटाकडून उमेदवार जाहीर होणार की दोन्ही गटाकडून उमेदवार उभे केले जातील, हे अद्याप स्पष्ट झालं नाही. असं गृहीत धरलं की दोन्ही गटाने एकत्र विचार करून एकच उमेदवार ठरवला, तर निवडणूक चिन्हाबाबत वाद निर्माण होणार नाही.

पण दोन्ही गटांनी निवडणुकीत आपले उमेदवार जाहीर केले तर निवडणूक चिन्ह कोणाला द्यायचं? याचा निर्णय निवडणूक आयोगाला घ्यावा लागेल. त्यासाठी दोन्ही गटाकडून निवडणूक आयोगासमोर पुरावे सादर करावे लागतील. ही प्रक्रिया किती दिवस चालेल, याबाबत स्पष्टपणे सांगता येणार नाही. अंधेरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या आधी दोन्ही गटांना निवडणूक आयोगासमोर पुरावे सादर करता आले नाहीत. तर आयोगापुढेच एकच पर्याय उरतो, तो म्हणजे निवडणूक चिन्ह गोठवणे. त्यानुसार निवडणूक चिन्ह गोठवलं जाऊ शकतं, असं विधान कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांनी केलं आहे.

# अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीचा पाठिंबा कोणाला?

## शरद पवारांनी दोन वाक्यात विषयच संपवला

। मुंबई । महाईन्यूज ।

अंधेरी ( पूर्व ) विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. अंधेरी (पूर्व) येथील शिवसेना आमदार रमेश लटके यांचे १२ मे रोजी निधन झाल्याने या जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. शिवसेना विरुद्ध भाजपा यांच्यात थेट ‘सामना’ या ठिकाणी होणार आहे. त्यात शिवसेनेचा मित्रपक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस कोणाला पाठिंबा देणार? अशी चर्चा सुरु होती. यावर आता राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाष्य केलं आहे.




पुण्यात काँग्रेसचे नेते आबा बागुल यांनी आयोजित केलेल्या नवरात्र महोत्सवात महर्षी पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला शरद पवार यांनी उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमानंतर शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी त्यांना अंधेरी पूर्व निवडणुकीत कोणाला पाठिंबा दर्शवणार, असा सवाल विचारला. त्यावर “राष्ट्रवादी पक्ष अंधेरी पोटनिवडणुकीत शिवसेनेला मदत करणार,” असे शरद पवार यांनी स्पष्ट केलं.

### उमेदवार कोण?

**अंधेरी (पूर्व) च्या विधानसभा जागेवर एकनाथ शिंदे गट दावा करण्याच्या तयारीत असून, भाजपकडून मुरजी पटेल यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. शिवसेनेकडे असलेल्या या जागेवर शिंदे गट दावा करीत आहे. शिवसेना-भाजप युती २०१९ मध्ये असताना ही जागा शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने भाजपाचे माजी नगरसेवक मुरजी पटेल यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. लटके यांनी त्यांचा १६९६५ मतांनी पराभव केला, तरी ४५८०८ मते मिळवून ते दुसऱ्या स्थानी होते. लटके यांची मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी चांगली मैत्री होती. त्यामुळे शिवसेनेची ही जागा शिंदे गटाला मिळायला हवी, असे काही नेत्यांना वाटत आहे. तर, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लटके यांच्या पत्नी ऋतुजा यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतल्याने ही निवडणूक लढवू नये, असाही एक मतप्रवाह शिंदे गटामध्ये आहे. मात्र, भाजपाने काही काळापासून ही जागा लढविण्याची तयारी सुरू केली असून, मुरजी पटेल यांनी कामही सुरू केलं आहे.**

# मनसेचा ठाकरे गटाच्या दसरा मेळाव्यावर निशाणा

### गजानन काळे यांनी शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या दसरा मेळाव्यावर निशाणा साधला आहे.

।मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते गजानन काळे यांनी शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या दसरा मेळाव्यावर निशाणा साधला आहे. “काँग्रेस आणि ‘नवाब सेनेत’ आधीच मांडवली झाली आहे,” असा आरोप गजानन काळेंनी केला. तसेच ठाकरे गटाचा दसरा मेळावा हिंदुत्वाच्या विचारांचा नाही, तर काँग्रेस राष्ट्रवादीच्या विचारांचा होईल,” असा दावा केला. गजानन काळेंनी एक व्हिडीओ जारी करत प्रतिक्रिया दिली.

गजानन काळे म्हणाले, “तुम्ही आम्हाला काँग्रेसच्या भारत जोडोला मदत करा, आम्ही तुमच्या शिवतीर्थवरील टोमणे मेळाव्याला मदत करतो असं ठरवून काँग्रेस आणि नवाबसेनेची मांडवली आधीच झाली होती. आता



मातोश्री आणि सेनाभवनाबाहेर काँग्रेस आणि राष्ट्रवादीने शिवतीर्थावरील टोमणे मेळाव्याला बॅनरमध्ये शुभेच्छा दिल्यात. याचाच अर्थ हा टोमणे मेळावा हिंदुत्वाच्या विचारांचा नाही, तर काँग्रेस राष्ट्रवादीच्या विचारांचा होईल.” “सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नवाबसेना प्रमुखांना अबु आझमी आणि असदुद्दीन ओवैसी यांच्या शुभेच्छांचीही प्रतिक्षा आहे. लवकरच अबु आझमी आणि ओवैसीच्या शुभेच्छा आल्या की शिवतीर्थवरील टोमणे मेळावा कोणत्या विचारांचा होईल हे स्पष्ट होईल,” असं म्हणत गजानन काळेंनी शाब्दिक हल्ला चढवला.

# ‘शतपावली’साठी घराबाहेर पडलेल्या तरुणाचा पाठलाग

## भररस्त्यात 20 वेळा चाकूने भोसकलं, लोक फक्त पाहत राहिले

**। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

दिल्लीमध्ये २१ वर्षीय तरुणाची भररस्त्यात निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भररस्त्यात तरुणाला तब्बल २० वेळा चाकूने भोसकण्यात आलं. या हल्ल्यात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, तरुणावर हल्ला होत असताना लोक फक्त पाहत उभे राहिले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या भांडणातून तरुणावर हल्ला करुन त्याची हत्या करण्यात आली आहे. घटनेनंतप परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव मनिष असून तो सुंदर नगरी परिसरात वास्तव्यास होता. आरोपींचीही ओळख पटली असून आलम, बिलाल आणि फैझान अशी त्यांची नावं आहेत. तिघांविरोधातही हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान दिल्ली पोलिसांनी ट्वीट करत हे जातीय प्रकरण नसल्याचं स्पष्ट केलं आहे. काही लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवत असून, त्यांच्यावर कारवाई केली जाईल असा इशारा पोलिसांनी दिला आहे. तसंच लोकांना शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री ७ वाजून ४० मिनिटांनी घडलेली ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. सीसीटीव्हीत आरोपी पीडित तरुणाची कॉलर पकडून त्याच्यावर वार करत असल्याचं दिसत आहे. तरुण पाळून जाण्याचा प्रयत्न करतो, पण आरोपी त्याला पकडतात. आरोपी तरुणाला रस्त्यावर फरफटत नेताना आणि सतत वार करताना दिसत आहेत. यावेळी दोन लोक रस्त्यावर उभे होते, पण त्यातील कोणीही मदतीसाठी पुढे सरसावलं नाही.

“आम्हाला स्थानिकांनी फोन करुन घटनेची माहिती दिली. आमचं पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आलं. रुग्णालयात पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. तपासादरम्यान तीन आरोपींची ओळख पटली असून, त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे”.



**पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या भांडणातून तरुणावर हल्ला करुन त्याची हत्या करण्यात आली आहे. घटनेनंतप परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव मनिष असून तो सुंदर नगरी परिसरात वास्तव्यास होता. आरोपींचीही ओळख पटली असून आलम, बिलाल आणि फैझान अशी त्यांची नावं आहेत. तिघांविरोधातही हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# चीनमधील उद्योग भारतात आणण्यासाठी केंद्राने आखली रणनीती

## 1.2 ट्रिलिअनची योजना घोषित

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारताचा औद्योगिक विकास व्हावा याकरता केंद्र सरकारने महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. चीनला मागे टाकण्याकरता भारताने १.२ ट्रिलिअन डॉलरची पीएम गती शक्ती योजना आखली असून यामाध्यमातून चीनमधील कंपन्या भारतात आणण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. कोणताही प्रकल्प करताना वेळ न घालवता, आहे त्या खर्चात तो पूर्णत्वास केल्यास जागतिक कंपन्या भारतात येतील, असं मत वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयातील लॉजिस्टिक्सचे विशेष सचिव अमृत लाल मीना यांनी एका मुलाखतीत म्हटलं होतं. त्यानुसार, आता वेगाने कामे झाल्यास चीनसोबतच्या स्पर्धेत भारताला मोठा फायदा होऊ शकतो.

पीएम गती शक्ती योजनेसाठी १०० लाख कोटींचा निधी दिला असून याद्वारे केंद्रातील १६ मंत्रालयांना एकत्रित करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आलाय. हे पोर्टल म्हणजे



### कसा असेल गती शक्ती प्रकल्प

- रेल्वे, बंदले आणि विमानतळे एकमेकांशी जोडले जाणार. यामार्फत लॉजिस्टिक नेटवर्क मजबूत करण्यात येणार
- लालफितीचा कारभार कमी होणार, पायाभूत सुविधांसाठी तत्काळ परवानगी मिळणार
- गती शक्ती पोर्टलकडून १३०० प्रकल्पांवर देखरेख
- भूसंपादन, वन आणि पर्यावरण खात्यांच्या मंजूरीसाठी ४० टक्के प्रकल्प रखडले आहेत. हे रखडलेले प्रकल्प खर्चिक होणार आहे. किमान 422 प्रकल्पांमध्ये काही समस्या होत्या आणि पोर्टलने त्यापैकी सुमारे 200 समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे.

# नॅशनल हेराल्ड प्रकरणी डी. के. शिवकुमारांना ईडीचे समन्स

**।नवी दिल्ली । । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेली ‘भारत जोडो यात्रा’ कर्नाटकात पोहचली आहे. आज ( ३ सप्टेंबर ) या पदयात्रेचा कर्नाटकात चौथा दिवस आहे. त्यात आता अंमलबजावणी संचालनालयाने ( ईडी ) कर्नाटक काँग्रेसचे अध्यक्ष डी. के. शिवकुमार यांना समन्स बजावलं आहे. नॅशनल हेराल्ड आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी हे समन्स बजावल्याचे सांगण्यात येत आहे. डी. के. शिवकुमार हे कर्नाटकात सुरु असलेल्या ‘भारत जोडो यात्रे’त सहभागी आहेत. त्यातच त्यांना ईडीने समन्स बजावलं आहे. त्यानुसार ७ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील फेडरल तपास संस्थेसमोर हजर राहण्यास सांगितलं आहे. नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणात हे समन्स बजावण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, यापूर्वी १९ सप्टेंबर रोजी बेहिशोबी मालमत्ताप्रकरणी डी. के. शिवकुमार यांची चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर ईडी कार्यालयातून बाहेर पडल्यावर प्रसारमाध्यमांशी बोलताना डी. के. शिवकुमार यांना सांगितलं, “एका आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आलं आहे. मात्र, मला या प्रकरणाबाबत काहीच माहिती नाही. चौकशीवेळी ईडी अधिकाऱ्यांनी माझ्या ट्रस्ट आणि भावाकडून यंग इंडियाला देण्यात आलेल्या पैशांबद्दल विचारले.”

नोव्हेंबर २०१२ मध्ये सुब्रह्मण्यम स्वामी यांनी या प्रकरणामध्ये खासगी तक्रार दाखल करत गांधी कुटुंबाने सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी त्यांच्या मालकीच्या यंग इंडिया लिमिटेडच्या मालकीची करुन घेतल्याचा आरोप केला. या करारामुळे सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना वृत्तपत्र छापण्याबरोबरच त्याच्याशीसंबंधित हजारो कोटींची दिल्ली आणि उत्तर प्रदेशमधील संपत्तीही मिळाल्याचा दावा स्वामींनी केलाय. तसेच काँग्रेसने या प्रकरणामध्ये दिलेलं कर्ज हे बेकायदेशीर असल्याचा दावा स्वामींनी केलाय. २०१३ साली सुब्रमण्यम स्वामी यांनी दिल्ली सत्र न्यायालयात याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर नॅशनल हेराल्ड प्रकरणात आयकर विभागाने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची चौकशी सुरु केली होती.



### काय आहे प्रकरण?

**पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्थापन केलेले ‘नॅशनल हेरॉल्ड’ वृत्तपत्र इ.स. २००८ साली बंद पडले. पं. जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटिश साम्राज्यशहांना विरोध करण्यासाठी १९३८ मध्ये सुरू केलेले हे काँग्रेसचे मुखपत्र होते. हे वृत्तपत्र बंद पडल्यानंतर ‘यंग इंडिया’ कंपनीने २०१० साली ते विकत घेतले. यंग इंडिया लिमिटेड या कंपनीची स्थापना नोव्हेंबर २०१० साली झाली होती. या कंपनीमध्ये सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा सर्वात मोठा म्हणजे ७६ टक्के वाटा होता. नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र २००८ पासून आर्थिक तोटा होत असल्याचं कारण देत बंद करण्यात आलं होतं. काँग्रेसने पुढे जाऊन ‘एजेएल’ला ९० कोटी रुपयांचे व्याजमुक्त कर्ज दिले. पक्षाने सांगितले की, हे पैसे वृत्तपत्राला परत आणण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात मदत करण्यासाठी होते. तथापि, वृत्तपत्राचे पुनरुज्जीवन होऊ शकले नाही आणि एजेएल कॉंग्रेसचे कर्ज फेडण्यात अपयशी ठरले.**

**२०१० मध्ये काँग्रेसने ‘एजेएल’कडे ९० कोटींच्या कर्जाची रक्कम परत मागितली. मात्र त्यावेळी कंपनीकडे एवढे पैसे नव्हते. त्यामुळे कंपनीने त्यांच्याकडील मालकी ही गांधींच्या मालकीच्या यंग इंडिया कंपनीकडे सुपूर्द केली. यासाठी यंग इंडियाने ‘एजेएल’ला केवळ ५० लाख रुपये दिले. याचवरुन गांधींनी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी ताब्यात घेतली आणि या कंपनीच्या मालकीची २००० कोटींची संपत्तीही आपल्या ताब्यात घेतल्याचा आरोप केला जातोय.**

# करीना कपूर सार्वजनिक मालमत्ता नाहीं

आपल्या आवडत्या स्टार्सची एक झलक पाहण्यासाठी चाहते उत्सुक असतात. जेव्हा त्यांना आवडत्या स्टारला भेटण्याची संधी मिळते तेव्हा काहीवेळा ते उत्साहात संयम गमावतात. अशीच घटना बॉलिवूड अभिनेत्री एकता कपूरसोबत घडली. याचा व्हिडिओ पाहून लोकही हैराण झाले आहेत.

सध्या करीनाचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये एक व्यक्ती फोटो काढण्यासाठी अभिनेत्रीच्या अगदी जवळ आला होता. आपल्या इतक्या जवळ आलेल्या व्यक्तीला पाहून करीना कपूरही घाबरली. व्हिडिओमध्ये करीना विमानतळावर आहे आणि चाहत्यांनी तिला घेरल्याचे दिसते. एक व्यक्ती करीना कपूरच्या खांद्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न करतो. तो करीनाच्या खांद्यावर हात ठेवून फोटो काढण्याचा प्रयत्न करतो. परंतु, करीनाच्या रक्षकांनी त्या माणसाचा हात धरून झटकले. यानंतरही तो व्यक्ती पुन्हा पुन्हा अभिनेत्रीसोबत फोटो काढण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा फॅन करीनाच्या जवळ येऊन खांद्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न करतो तेव्हा करीनाही घाबरते. व्हिडिओ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर युजर्सच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. एका युजरने व्हिडिओवर कमेंट करताना लिहिले की, बेबो घाबरली होती. तर दुसऱ्याने लिहिले, यार ती सार्वजनिक मालमत्ता नाही. एकाने लिहिले, एक मर्यादा असते.



# हतिक रोशनसोबत फाल्गुनी पाठकने केला डान्स

गरबा आणि फाल्गुनी हे ठरलेले गणित आहे. दरवर्षी नवरात्रीला फाल्गुनी पाठक गरबाची रात्र हा कार्यक्रम आयोजित करते. या कार्यक्रमात लोक तिच्या गाण्यांवर नाचतात. मात्र, यावेळी पारंपरिक नृत्या व्यतिरिक्त गायिका स्वतः बॉलिवूड डान्स करताना दिसली. फाल्गुनीचा हतिक रोशनसोबतचा डान्स व्हिडिओ समोर आला आहे.

देशभरात नवरात्रोत्सव साजरा केला जात आहे. या खास प्रसंगी फाल्गुनी पाठक गरबा आणि दांडिया रात्रीचे आयोजित करते. फाल्गुनी पाठकच्या गाण्यांवर गरबा व दांडिया करायला कोणाला आवडणार नाही. सेलिब्रिटीही यात मागे नाहीत. अभिनेता हतिक रोशनलाही स्वत:ला रोखता आले नाही. फाल्गुनीने गायलेल्या गाण्यांवर त्याने जबरदस्त डान्स केला. या डान्सचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यावेळी फाल्गुनीही स्वत:ला रोखू शकली नाही आणि तिने हतिक रोशनबरोबर वन टू वन डान्स स्टेप केला. हतिक रोशनचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. ज्यामध्ये तो फाल्गुनीसोबत पारंपरिक डान्स स्टेप्स करीत आहे. पंडालमध्ये आल्यावर हतिक रोशनने सर्वप्रथम माता राणीला हात जोडले. यानंतर हतिकनेही आपल्या स्टाईलने चाहत्यांची मने जिंकली. त्याने सर्वांना शुभेच्छा दिल्या. हतिक रोशन एकटा डान्स करीत नव्हता तर फाल्गुनीनेही त्याच्यासोबत डान्स केला. चाहत्यांना हतिक-फाल्गुनीचा डान्स आवडला.



एकीकडे फाल्गुनी गात आहे. दुसरीकडे हतिक रोशन डान्स करीत आहे. हतिकच्या डान्ससोबतच त्याच्या स्टाइलचेही सगळेच कौतुक करीत आहेत. विक्रम वेधा प्रदर्शित झाल्यानंतर हतिकचा हा पहिलाच व्हिडिओ आहे. ज्यामध्ये तो सार्वजनिक ठिकाणी डान्स करत आहे.


# आलियाने जिंकली मने म्हणाली; "माझा भारत महान"

'ब्रह्मास्त्र' चित्रपटाच्या जोरदार यशानंतर आलिया आता तिची प्रेग्नेंसी एन्जॉय करत आहे. गरोदरपणातही ती तिच्या आरोग्यासोबत कामावर लक्ष केंद्रित करत आहे.ती नेहमीच कुठे न कुठे ,अनेक कार्यक्रमात सक्रिय असते. नुकतंच आलियाने सिंगापूरमध्ये टाइम 100 इम्पॅक्ट अवॉर्ड्समध्ये हजेरी लावली.तिला TIME100 इम्पॅक्ट अवॉर्डने सन्मानित करण्यात आलं.



आलिया भट्टला तिच्या चित्रपटातील उत्कृष्ट कामगिरीसाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार अशा लोकांना दिला जातो, जे आपल्या क्षेत्रात काहीतरी वेगळे करत असतात. आलियाचे 'हायवे', 'गंगूबाई काठियावाडी', ' राझी' आणि 'डार्लिंग्स' सारखे सर्वच चित्रपट हिट झालेत. तिने सर्वच चित्रपटात दमदार अभिनयाने सर्वांचीच मने जिंकली आहेत. इम्पॅक्ट अवॉर्ड्समध्ये तिने खास गोल्डन कलरचा गाऊन परिधान केला होता. यामध्ये ती कमालीची सुंदर दिसत आहे.यात ती तिचे बेबी बंपही फ्लॉन्ट दाखवत आहे. आलियाला टाईम अवॉर्ड मिळाल्यानंतर तिनं जोरदार भाषणही केलं. भाषणात आलिया म्हणाली, 'माझा भारत महान आहे'. आपल्या कारकिर्दीबद्दल आणि व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलताना तिने सांगितले की भारत सर्वोत्तम आहे. भारतामुळे ती आज इथे आहे. आलियाने तिच्या इन्स्टाग्रामवर याबाबत माहिती देत फोटो शेअर केले आहेत. यानंतर तिच्यावर कौतूकाचा वर्षाव होतोय.

# घटस्फोटानंतर आमच्यातील नातं बहरलं...



बॉलिवूडमध्ये घटस्फोट हा काही मोठा विषय नाही.मग ते आमिर आणि किरण ,हिमेश आणि कोमल, फरहान आणि अधुना भवानी असो कि मलायका अरोरा आणि अरबाज खान. मलायका अरोरा आणि अरबाज खानसोबत 18 वर्षांचे लग्न मोडले. मलायका आणि अरबाजचे इतक्या वर्षांचे लग्न मोडल्याने ही जोडी चांगलीच चर्चेत आली होती. मात्र, या दोघांनी घटस्फोटाबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले नव्हते.

दरम्यान याबाबत मलायका विचारण्यात आले त्यावेळी ती म्हणाली कि, "मला वाटतं की मी स्वतःला मध्यभागी ठेवुन हा निर्णय घेतला आहे. माझे माझ्या मुलासोबत खूप चांगले संबंध आहेत. मी आता खरंच आनंदी आहे. माझे आता अरबाजसोबतही चांगले संबंध आहेत. मी स्वतःसाठी हा निर्णय घेतला आहे आणि एक महिला म्हणून मला याची अजिबात भीती वाटत नाही. अरबाज आणि मी आता आमच्या आयूष्यात खूप पुढे गेलो आहोत. आम्ही नेहमीपेक्षा आनंदी आणि शांत आहोत. तो खूपच चांगला माणूस आहे, मी त्याला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देते". घटस्फोटानंतर अरबाज सोबतचे तिचे नाते आता चांगले झाले असल्याचेही तिने सांगितले. मलायका आणि अरबाज त्यांचा मुलगा अरहान खानला एअरपोर्टवर सोडण्यासाठी एकत्र दिसले होते.मलायका अर्जुन कपूरला तर अरबाज जॉर्जिया अँड्रियानीला डेट करत आहे. मलायका लग्नाबाबत विचारले असता मी अजून त्याचे उत्तर देउ शकणार नसल्याचे तिने सांगितले.

## शॉर्ट न्यूज »

### भालाफेकपटू शिवपाल सिंग उत्तेजक द्रव्य सेवनप्रकरणी दोषी



।इंडोनेशिया। महाईन्यूज

भारतातील अव्वल भालाफेकपटूंपैकी एक असलेल्या शिवपाल सिंगला गेल्या वर्षी उत्तेजक द्रव्य चाचणीत अपयशी ठरल्याबद्दल नाडा (नॅशनल अँटी-डोपिंग एजन्सी) च्या डोपिंग विरोधी शिस्तपालन समितीने चार वर्षांसाठी खेळातून निलंबित केले आहे. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याच्यानंतर भारताचा दुसरा सर्वात यशस्वी भालाफेकपटू असलेला शिवपाल सिंग याची कारकीर्द संकटात सापडली आहे.

टोकियो ऑलिम्पिकमध्ये भाग घेतलेल्या शिवपालला गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये स्पर्धाबाह्य चाचणीत अपयश आल्यामुळे तात्पुरत्या निलंबनात ठेवण्यात आले होते. त्याच्या नमुन्यात बंदी घातलेल्या पदार्थाची पुष्टी ही मेथेंडिएनोन होती. स्टेरॉइड मेथेंडिएनोन चाचणीत तो पॉझिटिव्ह आढळला.

# तिसऱ्या टी-20 सामन्यातून केएल राहुलसह स्टार फलंदाजांना दिली विश्रांती!

## तिसऱ्या टी20 सामन्यात श्रेयस अय्यरसह अनेक खेळाडूंना संघात संधीची शक्यता

।अहमदाबाद । महाईन्यूज ।



दक्षिण आफ्रीकेविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात भारतीय संघाने १६ धावांनी विजय मिळवत ऐतिहासिक मालिका जिंकली. त्यामुळे मालिकेतील शेवटचा सामना हा फक्त औपचारिक राहिला आहे. या सामन्यात भारताचा उपकर्णधार केएल राहुलसह अनेक स्टार फलंदाजांना विश्वचषकाआधी विश्रांती देण्यात आली आहे. तिसऱ्या टी२० सामन्यात यामुळे श्रेयस अय्यरसह अनेक खेळाडूंना संघात संधी मिळू शकते.

सूत्रांच्या माहितीनुसार मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना मंगळवारी इंदौर येथे खेळला जाणार आहे. केएल राहुलसह भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली यांना भारतीय संघातून वगळले आले आहे. विराट हा गुवाहाटी येथून थेट मुंबईत दाखल झाला आहे. टी२० विश्वचषक स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाला रवाना होण्यापूर्वी त्याने तीन दिवसांची सुट्टी घेतलीय आणि तो कुटुंबियांसोबत राहणार आहे. विराटसह बीसीसीआयने आणखी एका फॉर्मात असलेल्या फलंदाजाला विश्रांती दिल्याचे वृत्त समोर येतेय. त्यामुळे इंदौर येथे होणाऱ्या तिसऱ्या सामन्यात सुपर हिट जोडी दिसणार नाही. भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा तिसरा टी२० सामना झाल्यावर मुंबईला जाणार आहे, कारण भारत ऑस्ट्रेलियात खेळल्या जाणाऱ्या टी२० विश्वचषकासाठी ६ ऑक्टोबरला मुंबईतून निघणार आहे. मागे विराटला वेस्ट इंडिज विरुद्धच्या मालिकेतही आराम दिला गेला होता यावरून चर्चांना उधान आले होते.

> **मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना मंगळवारी इंदौर येथे खेळला जाणार आहे. केएल राहुलसह भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली यांना भारतीय संघातून वगळले आले आहे**

तेव्हा त्याने बॅटला हातदेखील लावला नव्हता. नंतर त्याने आशिया चषक २०२२ मध्ये जबरदस्त पुनरागमन केले. त्याने जवळपास तीन वर्षानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतके केले होते. आता तो तिसऱ्या टी२० मध्ये खेळणार नाही असे रिपोर्ट्स पुढे येत असताना त्याच्याजागी कोण हा प्रश्नही निर्माण झाला आहे.

श्रेयस अय्यर, मोहम्मद सिराज व उमेश यादव यांना आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत संधी मिळालेली नाही. त्यामुळे आता मालिका जिंकल्यानंतर तिसऱ्या सामन्यात भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल पाहायला मिळू शकतो. आघाडीची फळी चांगली कामगिरी करत आहे.

तर दिनेश कार्तिक दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडतोय.

# दुबळ्या मलेशियावर भारताचा ३० धावांनी विजय

## 'डकवर्थ लुईस'नेही दिला हात

। नवी दिल्ली। महाईन्यूज ।

महिला आशिया चषकात भारतीय संघाचा दुसरा सामना सोमवारी मलेशियाशी आहे. या सामन्यात मलेशियाने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी करण्याचे आव्हान दिले. त्यानुसार भारताने उत्तम सुरूवात केली. या सामन्यासाठी स्म्रीती मंधाना हिला विश्रांती दिली असून तिच्या अनुपस्थितीत सभिनेनी मेघना शेफाली वर्मा हिच्यासोबत सलामीला आली. यावेळी भारताने २० षटकात ४ गडी गमावत १८१ धावांचा डोंगर उभारला आहे. पण धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या मलेशियाने ५.२ षटकात २ गडी गमावत केवळ १६ धावा केल्या. मात्र त्यानंतर अचानक पाऊस पडल्याने सामना पुन्हा सुरु होऊ शकला नाही. त्यामुळे भारतीय संघाला डकवर्थ लुईसच्या नियमानुसार ३०धावांनी विजयी घोषित करण्यात आले. भारताची सलामीवीर एस मेघना हिला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. तत्पूर्वी, भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना १८१ धावा केल्या.



सभिनेनी मेघना आणि शफाली वर्मा यांनी पहिल्या पॉवरप्लेमध्ये ४७ धावा करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. मेघनाने-शफाली यांनी पहिल्या विकेटसाठी ११६ धावांची भागीदारी केली. मेघनाने अर्धशतकी खेळी केली. तिने ५३ चेंडूत ६९ धावा केल्या. यामध्ये तिने ११ चौकार आणि एक षटकार खेचला. ती बाद झाल्यावर शफालीने रिचा घोष हिच्यासोबत ४२ धावांची भागीदारी केली. शफाली ४६ धावा करत बाद झाली. तिने एक चौकार आणि तीन षटकार खेचले, तर किरण नवगिरे ही भोपळाही फोडू शकली नाही. श्रीलंकेविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात विजय मिळवल्यानंतर भारतीय संघाने या सामन्यात अनेक प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली. उपकर्णधार स्मृती मंधानाबरोबर स्नेह राणा, पूजा वस्त्राकर आणि रेणुका सिंग ठाकुर यांनाही आराम दिला गेला. त्यामुळे एस मेघना आणि किरण नवगिरे यांच्यासोबत राजेश्वरी गायकवाड आणि सभिनेनी मेघना यांना अंतिम अकरामध्ये स्थान मिळाले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही